# गुरुकृपायोगाचे माहात्म्य

## विषयसूची

१. ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ६

२. मनोगत ८

## ग्रंथाची अनुक्रमणिका

**प्रकरण १ : गुरुकृपायोग** १०

१ अ. अर्थ — १ आ. गुरुकृपायोगाची निर्मिती आणि स्थिती १०

१ इ. महत्त्व — १ ई. वैशिष्ट्ये १०

१ उ. गुरुकृपा कार्य कशी करते ? ४१

**प्रकरण २ : गुरुकृपायोग आणि इतर योगमार्ग यांची तुलना** ४८

२ अ. गुरुकृपायोग म्हणजे ‘विहंगम योग’ आणि इतर योग म्हणजे ‘भासमान योग’ अन् त्यांच्यामुळे ‘वियोग’ होणे ४८

२ आ. विशिष्ट योगमार्ग आणि गुरुकृपायोग ४८

२ इ. आध्यात्मिक पातळीप्रमाणे विविध योगमार्गांनुसार साधना ५९

२ ई. उन्नतीची लक्षणे — २ उ. उन्नतीचे प्रमाण ६३

२ ऊ. गुरूंनी सांगितलेल्या आणि स्वतःच्या मनाने केलेल्या निरनिराळ्या योगमार्गांतील प्रगतीच्या टप्प्यांची स्थूलमानाने तुलना ६९

२ ए. ‘गुरुकृपायोगामुळे जीव स्वावलंबी बनतो आणि इतर योगांमुळे जीव दिव्य शक्तींच्या तडाख्यात सापडून परावलंबी होतो. ७५

२ ऐ. ईश्वरी कृपा ७५

**प्रकरण ३ : वाईट शक्तींचा त्रास आणि गुरुकृपायोग** ७६

३ अ. मांत्रिकांचा त्रास असतांनाही साधकांनी गुरुकृपायोगानुसार समष्टी कार्य चालूच ठेवल्यामुळे मांत्रिकांनी चिडून त्रास देणे ७६

३ आ. गुरुकृपायोगानुसार साधना करणाऱ्या साधकाची वाईट शक्ती गुरुरूप किंवा उपास्यदेवतेचे रूप घेऊन जास्त काळ फसगत करू न शकणे ७६

३ इ. गुरुकृपायोगानुसार साधना करणारे हे निर्गुणाचे उपासक असल्यामुळे आणि त्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे मोहिनीरूपाने साधकांना भुलवण्याचे मांत्रिकांचे प्रयत्न केवळ १० टक्केच यशस्वी होणे ७७

३ ई. गुरुकृपायोगाने साधकांना समष्टी साधनेतून निर्गुण भक्ती शिकवल्यामुळे आणि परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या संकल्पशक्तीने साधक मांत्रिकांच्या जाळ्यात न फसणे ७७

३ उ. स्वभावदोष न्यून केल्याने मनोलय आणि बुद्धीलय होऊन समाजात धर्मकार्य करता येणे आणि गुरुकृपायोगाने हेच शिकवणे ७८

३ ऊ. ईश्वराला प्रिय सत्त्वगुण हा ऊर्जास्वरूप असल्याने तो असुरांच्या रज-तम गुणात्मक शक्तीला हरवू शकणे आणि गुरुकृपायोगाने हे साध्य होणे ७८

३ ए. वाईट शक्तींवर नित्यस्वरूपी उपाय म्हणजे गुरुकृपायोगात सांगितलेली क्षात्रधर्म साधना करणे ७९

**प्रकरण ४ : ईश्वरी राज्याची स्थापना आणि गुरुकृपायोग ८०**

४ अ. गुरुकृपायोगानुसार साधना करतांना झळ सोसणारा, तसेच क्षात्रतेज आणि ब्राह्मतेज असलेला मोक्षप्राप्तीसाठी लायक असणे अन् तो ईश्वरी राज्याची निर्मिती करू शकणे ८०

४ आ. गुरुकृपायोगात ईश्वरी राज्यासाठी साधना, समष्टी साधना आणि व्यष्टी साधना यांचा त्रिवेणी संगम असल्यानेच या योगाद्वारे जिवाची आध्यात्मिक उन्नती जलद होणे अन् साधकांना ईश्वरी राज्याची स्थापना करणे शक्य होणार असणे ८१

४ इ. गुरुकृपायोगानुसार साधना केल्याने ईश्वरी राज्याची स्थापना होण्याची प्रक्रिया ८२

# विषयसूचीतील क्रमांक २

## मनोगत

ईश्वरप्राप्तीसाठी कर्मयोग, भक्तीयोग, ध्यानयोग, ज्ञानयोग यांसारखे विविध योगमार्ग (साधनामार्ग) आहेत. या सर्वांना सामावून घेणारा असा एक योगमार्ग आहे आणि तो म्हणजे 'गुरुकृपायोग' ! म्हणूनच गुरुकृपायोगानुसार साधना करणाऱ्याला कोणत्याही विशिष्ट योगाचा अवलंब करून साधना करावी लागत नाही, तर त्याची आध्यात्मिक उन्नती सहजरीत्या, सर्वांगीण आणि इतर योगमार्गांच्या तुलनेत शीघ्रगतीने होते. म्हणूनच 'गुरुकृपायोग' हा ईश्वरप्राप्तीचा सर्वश्रेष्ठ असा 'सहजयोग' आहे.

एकट्याने साधना करून स्वबळावर ईश्वरप्राप्ती करून घेणे फार कठीण असते. यापेक्षा अध्यात्मातील एखाद्या अधिकारी व्यक्तीची, म्हणजेच गुरु किंवा संत यांची कृपा संपादन केली, तर ईश्वरप्राप्तीचे ध्येय लवकर साध्य होते. हेच गुरुकृपेचे महत्त्व आहे. गुरु शिष्याचे अज्ञान घालवून त्याचा अहं न्यून करतात; म्हणून त्यांनी सांगितलेली साधना केल्याने जलद उन्नती होते.

गुरुकृपायोगाचे महत्त्व काय, गुरुकृपायोगानुसार साधना केल्यास इतर सांप्रदायिक साधनांच्या आणि योगमार्गांच्या तुलनेत अल्प कालावधीत जलद आध्यात्मिक उन्नती का अन् कशी होते, गुरुकृपायोगात मृत्यूपूर्वी आणि मृत्यूनंतरही जिवावर गुरुकृपा कशी असते यांसारख्या विविधांगी विषयांवर मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ आपल्याला एका नाविन्यपूर्ण ज्ञानविश्वात घेऊन जातो.

या ग्रंथात समाविष्ट असलेले सनातनच्या साधकांना मिळालेले ज्ञान समजण्यास थोडे कठीण आहे. असे असले तरी प्रत्यक्ष साधना करणाऱ्यास या ज्ञानात काठीण्य वाटणार नाही. जिज्ञासा आणि तळमळ असल्यास प्राथमिक अवस्थेतील साधकालाही या ज्ञानाचे आकलन होणे शक्य आहे.

या ग्रंथातील ज्ञानाचा उपयोग प्रत्येकाला आपली साधना वृद्धींगत करून ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी करता येवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना.

**– संकलक**

## परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांच्या नावांआधी विशिष्ट आध्यात्मिक उपाधी लावण्यामागील कारण

नाडीपट्टीवाचनाच्या (नाडीभविष्याच्या) माध्यमातून सप्तर्षी सनातनला मार्गदर्शन करतात. १३.५.२०२० या दिवशी सप्तर्षींनी सांगितले, 'यापुढे सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ' असेच संबोधावे; कारण या नावांतून दोघींना देवीतत्त्व मिळेल, तसेच याचा लाभ त्यांच्या नावांचा उल्लेख करणाऱ्यांनाही होईल.' सप्तर्षींच्या आज्ञेनुसार तसे संबोधणे चालू केले आहे. यांच्या नावातील संबोधनाविषयी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी सांगितले, ''श्रीसत्‌शक्ति' ही भगवंताच्या शाश्वत स्वरूपाशी संबंधित आहे आणि 'श्रीचित्‌शक्ति' ही भगवंताच्या वैश्विक ज्ञानाशी संबंधित आहे.''

## सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !

मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे; मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे आणि ग्रंथांची संरचना 'इन्‌डिझाईन' या संगणकीय प्रणालीत करणे, या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा – (०८३२) २३१२३३४ किंवा granthgoa@gmail.com

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.